# मुपीकर

## एक मुक्त व्यासपीठ

उद्योग व व्यापार



इतिहास व परंपरा



शेती व तंत्रज्ञान



युवा पिढी व चर्चा



| | |
|---|---|
| मित्रांशी हितगुज | शत्रुघ्न. |
| मुंग्यांची रांग.. | ( कवी :- स्वामीजी ) |
| माझी विस्म्रुतिची सवय | कल्पी जोशी |
| जुनी पत्रं | प्रसन्ना जीके |
| कथा ..... | सुनील जोशी |
| मोल | साधना गोखले |
| सरणार कधी रण...... | मृत्युंजय |
| असंही होतं एक प्रेम... | अभिजित थिटे |
| श्रावनासखा कृष्ण हरी ह्रुदयी वसे माझ्या | राजेश लोंढे |
| कवितेने सांगितली कविता करायला | समीर जोशी |
| तुझं हसणं.... | ऊमेश शितोळे |

# मित्रांशी हितगुज

शत्रुघ्न.

माझ्या तरुण मित्रांनो,

तरुण शरीरानी, मनानी, विचारांनी ......मित्रांनो मी कुठेही वयानी म्हणालो नाही.

आपण किती दिवस लहान राहायच ? किती दिवस आईच्या पदराखाली राहायच ? चला आज आपण जरा वेगळा विचार करु या. मी माझे विचार मांडतोय. मला तुमचे त्यावर मत ऐकायला नक्कीच आवडेल.

माझे दोन मित्र आहेत. माझ्यापेक्षा थोडे मोठे. एक आहे ललित भाटिया व दूसरा आहे अमित देशमुख. ललित तसा डोक्यानी बरा, खुप हुशार नाही. पण टाकाउसुद्धा नाही. ५ वी पासून त्याच्या सुज्ञ वडलांनी त्याला त्यांच्या एका मित्राच्या दुकानात अर्धवेळ नोकरीला लावल. ८ वीत असतानाच त्यानी घरीच स्टेशनरीचा धंदा चालू केला. कुठून तरी वह्या, पुस्तक, बाकी स्टेशनरी आणायचा व विकायचा. बोलण खुप चांगल. शाळा कॉलेजमधे जाउन तो स्टेशनरी विकायचा, ऑफ़िसेसमधे विकायचा. बघता बघता त्यानी एक लहानसा गाळा भाड्यानी घेतला, पुढे तोच गाळा विकत घेतला. हे सर्व करत असताना तो शिकत असायचा. मी कधीतरी त्याच्या दुकानात जायचो. हा ललित एकाच वेळी लोकांकडून पैसे घ्यायचा, हिशोब करायचा, सुट्टे बिनचूक द्यायचा, गिऱ्हाईकांशी बोलायचा, माल घेउन आलेल्या विक्रेत्याकडुन हिशोब करुन माल घ्यायचा व हजारो रुपये एकदा अथवा दोनदा मोजुन द्यायचा. मी मात्र माझ्या जवळ असलेल्या १०-१० च्या ८ नोटा, परत परत मोजुन त्याला द्यायचो. ललितच्या चेहऱ्यावर नेहेमी उत्साह असायचा, एक आत्मविश्वास असायचा. त्याला एकदा विचारल की ललित तू पैसे कसे इंव्हेस्ट करतोस? त्यानी मला सर्व प्लान सांगीतला. त्याच्याकडे पैसे साठवायचा, ते वाढवायचा, धंद्यात परत गुंतवायचा व धंदा वाढवायचा सर्व प्लॅन तयार होते.

अमितदादा हा प्रचंड हुशार होता. त्याचा कधी कधी मला खुप राग यायचा. कितीही कठिण गणित द्या दादा ते तोंडीच सोडवायचा, कोणतही कोड सांगा लगेच उत्तर तयार. त्याला या बाबतीत हारवायच कधी सुख मिळालच नाही. दादा BE ला युनिव्हर्सिटित पहिला आला. त्याला पहिलाच पगार ६५०००/- रु. मिळाला. वडलांना रिटायर होताना ६०००/- रु. पगार होता. दादा व घरचे सर्व खुश झाले. मोठी पार्टी दिली. मी मदतनीस होतोच. सर्वात शेवटी कॉंट्रॅक्टरला द्यायचे पैसे तयार ठेवायचे होते. दादानी मला मदतीला घेतल. द्यायचे पैसे मी, त्यानी त्याच्या आई, बाबांनी परत परत मोजले. कमीत कमी ते १२०००/- रुपये आम्ही १० वेळा मोजले असतील. पैसे दिल्यावर त्याच्या आईनी दादाला विचारल "अमित तुझी खात्री आहे न की तू पैसे बरोबर दिलेस ?" दादाचा चेहराच उतरला. मी दादाला विचारल "दादा तुला इतका जास्त पगार आहे. तू या पैशाच काय करायच ठरवल आहेस? त्याचा विनियोग कसा करणार?" आता माझा दादा एकदम बावळट वाटायला लागला. चेहऱ्यावरची हुशारी, डोळ्यातली चमक, बोलण्यातला हजर जबाबीपणा सर्व पार निघुन गेल. दादा केविलवाणेपणे म्हणाला "नाही रे मी यावर विचारच केला नाही"

माझ हे म्हणण नाही की शिक्षण उपयोगी नाही पण व्यवहार ज्ञान नसणं.....
दादाला पुढेमागे हे व्यवहार ज्ञान येईलच पण तो पर्यंत ललित त्या ज्ञानात किती तरी पुढे निघुन गेलेला असेल.

माझ्या मित्रांनो, जरा विचार करा, आपण कुठे मागे पडतोय ? आपण त्याच त्या एकाच पाय वाटेनी

चालत राहाणार का ? शाळेत जायच, खाली मान घालुन अभ्यास करायचा, १० वी-१२ वी व्हायच आणि पुढील शिक्षणाच्या व आयुष्याच्या एका अंधाऱ्या जगात शिरायच.

आपण नोकरी करा, अथवा व्यवसाय करा सारासार विवेक बुद्धी (commonsense ) फ़ार आवश्यक आहे. आणि ही चाकोरी बद्ध जिवनातून तयार होणं शक्यच नाही.

आजच्या गतिमान जगात तुम्ही तुमच्या जिवनाचा मार्ग जितक्या लवकर निवडाल व जितक्या लवकर त्यात स्थिर-स्थावर व्हाल तेव्हढ तुम्ही तुमच्या आयुष्यात यशस्वी व्हाल.

संधीचे घोडे खुप जोरात पळतात, त्यावर आरुढ व्हायच का त्या घोड्याच्या लाथा खात जगायच हेच फ़क्त ठरवायच आहे.

यासाठी काय कारायच ? तेच आपल्याला डिस्कस करायच आहे.

१. वेळेचा योग्य उपयोग करा
सर्वात पहिल, आपला सर्वात जास्त वेळ खाणारा मोबाईल फ़ेकुन द्या. हायजिनीकली तर तो वाईट आहेच, ते मी तुम्हाला वेगळ सांगायला नकोच. पण ह्या मोबईल कंपन्या आपल्याला त्याचं एक व्यसन लावतायत हे लक्षात घ्या. एका व्यक्तीला किती SMS करावे लागतात ? मला काही मित्र माहिती आहेत जे दिवस भर मोबाईल घेऊनच बसलेले असतात.

कॉप्युटरवर नुसते गेम खेळु नका. त्यावर रोज निदान एक तरी प्रोग्राम करा. एका तरी विषयाची नवी माहिती मिळावा. याला फ़ार तर फ़ार ३० मी. लागतील.

आपल्या दिवसच्या वेळेच टाईम टेबल करा. त्यात रिकामा वेळ असु द्या. तुमच्या बिझी वेळचं व रिकाम्या वेळचं योग्य प्रमाण असु द्या. खेळ आवश्यक आहेच.

वेळेचा विनियोग यावर आपण वेगळी चर्चा करु या.

२. जास्तीत जास्त माहिती मिळावा.

मला एक सांगा, आपल्याला आपल्या मित्र मैत्रिणींचे आई-वडिल काय करतात ? कोणत्या क्षेत्रात आहेत ? याची माहिती आहे का? आपण कधी त्यांच्याशी त्या विषयावर चर्चा केली आहे का ? नसेल तर करा. आपल्याला नक्कीच ५-१० निरनिराळ्या क्षेत्रांची माहिती मिळेल. त्यांच्याशी चर्चा केल्यावर आपण त्या संबंधात जास्त महिती इंटरनेटवर मिळवा.

मी एकदा कलकत्याला जात होतो. बाजुला एक आजोबा बसलेले होते. आजोबा खुप कमी बोलत होते. मी त्यांना विचारल तेव्हा समजल की ते एक्झिम बॅंकेमधे मोठ्या हुद्यावर होते. मी त्यांना विचारल "एक्झिम बॅंक नक्की काय करते, आयात निर्यात क्षेत्रावर ती कसा कंट्रोल ठेवते, व निर्यात करण्यासाठी कस उद्युक्त करते?" आजोबांना हा प्रश्न माझ्याकडुन नक्किच आपेक्षीत नव्हता. आधी नुसतच त्यांनी हासुन सोडुन दिल. पण नंतर त्यांनी मला बरीच माहिती दिली. काही मला समजली काही नाही. पण जी समजली ती सुद्धा बरीच होती. माझी खात्री आहे ही माहिती नक्किच फ़ुकट जाणार नाही.

३. सुट्टीत थोडे तरी पैसे मिळ्वायचा प्रयत्न करा.

आपल्या ज्ञानाच्या जोरावर, जे आपण शिकलो त्याच्या जोरावर काही तरी कमवा.
अ ) आपल्या भाषा चांगल्या असतील तर भाषांतराच काम करा, वेब साईट कंटेंट राईटींगच काम करा.
ब ) गणित सायन्स चांगल असेल तर क्लासेसला नोटस् काढुन द्या. आज कितीही मोठा व कितीही

नावाजलेला क्लास असला तरी त्यांना नोट्स् काढणं व त्या अपटुडेट ठेवण खुप कठीण जात. त्यांना अशा प्रकारच काम करणारी मंडळी हवीच असतात. यात बरा पैसा मिळतो.

क ) आपल्याकडे शिक्षण कमी असेल तर, ऑफ़िसेस , बँका व शाळांच्या स्टाफ़ला घरगुती पदार्थ खायला घेउन जा. यात खुप पैसा आहे.
ड ) आपल्याकडे गावाला जागा असेल तर वर लिहिलेल्या लोकांसाठी सहल आयोजित करा.
ई ) निरनिराळ्या पर्यटन क्षेत्रांची नीट माहिती मिळावा व पर्यटान गाईड (या साठी इंग्रजी नीट असाव)च काम करा.
फ़ ) आपल्या जवळपास असलेल्या वृद्ध पण सधन लोकांना औषध आणुन देण, सामान आणुन देण, विज बिल, फ़ोनच बिल भरण या सारखी काम करा. यात पैसा भरपूर आहे.
ग) शहरांमधे गाड्या साफ़ करण हा एक मोठा व्यवसाय झालाय. एक गुरखा सकाळाच्या २-३ तासात सहज ५०-६० गाड्या व तेव्हढ्याच स्कुटर, मोटर सायकल धुतो व साफ़ करतो. एका गाडिला २०० रु. व स्कुटरला १०० रु. महिना. करा आकडेमोड किती वेळात व तेही काहीही भांडवल न टाकता हा धंदा करता येतो.

आपल्याला पैशाची गरज असो वा नसो या पैसे कमावण्यानी आपलं व्यवहार ज्ञान नक्किच वाढेल, एक वेगळाच आत्मविश्वास निर्माण होईल.

या सुट्टीत करुन बघा, पुढिल वर्षाच्या शिक्षणाची सोय करा, निदान आपल्या पॉकेटमनीची सोय करा. आपल्याला जर पैशाची गरज असेल व वर्षभर शिकताना काही उद्योग हवा असेल तर हाच उद्योग तसाच पुढे चालु ठेवु शकता.

कदाचित याचाच उपयोग आपल्याला शिक्षणानंतर लवकर स्थिरस्थावर व्हायला होईल.

४. एका तरी व्यवसायाचा सखोल अभ्यास करयचा प्रयत्न करा.

आपल्या जवळच्या दुकानाचा व्यवहार, एखाद्या कारखान्याचा व्यवहार याचा अभ्यास करायचा प्रयत्न करा. आपल निरिक्षण व समज याच्या जोरावर त्या व्यवहारात असलेल्या त्रुटी शोधा, योग्य माणासापाशी व योग्य पद्दतीनी तुमच निरिक्षण व तुमचा त्यावर असलेला उपाय सुचवा. कदाचित तुमचा उपाय त्यांनी आधीच करुन पाहिला असेल, चर्चा होईल तुमच ज्ञान नक्किच वाढेल.

वेगळा विचार करायची सवय लागेल. जी तुमच्या पुढच्या आयुष्यात नक्किच उपयोगी ठरेल.

५. थोड तरी सोशल वर्क करा

आपल्या जवळपास असलेल्या एखाद्या समाजोपयोगी संस्थेबरोबर या सुट्टीत काही तरी काम करा. वृद्धाश्रमात जा, हॉस्पिटलमधे जा. बघा तुमचा आउट्लुक सगळा बदलुन जाईल.

जेव्हा तुम्ही जास्तीत जास्त लोकांशी बोलता तेव्हा तुमचा common sense नक्कीच वाढत असतो. निरनिराळ्या वयोगटातल्या लोकांशी, कमी जास्त समज असलेल्या लोकांशी, कस वागायच हे समजत जात.
व्यवहार व सोशल वर्क याची कधीच गल्लत करु नका. सोशलवर्कमधुन कधीच पैशांची आपेक्षा करु नका व व्यवहारात कधीच सोशलवर्क करु नका.

६. आपल्या पुढील आयुष्याची थोडी तरी रुपरेषा तयार करा.

आपल्याला पुढच्या आयुष्यात कोण व्हायचय ? आपलं आवडत क्षेत्र कोणत आहे ? त्या क्षेत्रात तज्ञ

होण्यासाठी किती मेहनत व पैसे लागतात? पुढे त्या क्षेत्रात कसे प्रॉस्पेक्टस् आहेत ? या सर्वाची एक ढोबळ रुपरेषा आपल्याजवळ तयार असणे गरजेचे आहे. आपल्या आवडीच्या क्षेत्रातल्या कमीत कमी एका

तज्ञ व्यक्तीशी आपली चर्चा झालेली असली पाहिजे. नक्कि कोण तज्ञ आहे व कोण फ़क्त हवेत बोलतय हे तर समजण फ़ार फ़ार आवश्यक आहे. त्यासाठी आपल्याला थोड तरी आपल क्षेत्र माहिती असण , लोकांशी बोलायची व ॲनलिसिस करायची सवय असण गरजेच आहे. हे सवयीनीच होत.

परदेशातली मुल फ़र लवकर आपल्या पायावर उभी असतात व त्यामुळे खऱ्या अर्थी आपण त्यांच्याशी कधीच स्पर्धा करु शकत नाही. भारतिय लोकांना परदेशात नोकऱ्या मिळातात त्या फ़ार लोलेव्हलच्या असतात व ज्या असतात त्या कमी पैसे देत असतात. आता ब्राझिल सारख्या अती गरिब देशातुन अमेरिकेत नोकऱ्या करण्यासाठी जेव्हा लोक यायला सुरुवात झाली, तेव्हा आपल्या लोकांच्या नोकऱ्यांवर हळु हळू गदा येत चालली आहे.

महाराष्ट्रात असलेले उद्योग भराभर परदेशी लोकांच्या हातात जातायत. जर आपण वेळेवर जागे झालो नाही तर मग आपली स्थिती कठीण आहे.

जग हे एक सिव्हिलाइज्ड जंगल आहे. त्यातला जंगल कायदा समजुन घ्या. इथे कोणी कोणावर दया दाखवणार नसतो. त्यात कस जगायच हे जाणुन घ्या.

आपण सर्वजण सुज्ञ आहात चला यावर चर्चा करु व सुखी होवु.

--------------------------------------------------------------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------------------------------------------------------

## मुंग्यांची रांग..  ( कवी :- स्वामीजी )

दाराची चौकट
भिंतीची फट
एकामागे एक
चालल्या निमूट
मुंग्यांची रांग..

दिवसभर श्रम
सरेना काम
भुकेचं पाप
गाळतं घाम
मुंग्यांची रांग..

कणकण धान्य
गरज मान्य
भुईच्या पोटात
साठवून धन्य
मुंग्यांची रांग..

चालण्याची शिस्त
सहकाराची भिस्त
चाकोरीत जगणं
नेहमीच व्यस्त
मुंग्यांची रांग..

दिसला नवा चारा
सर्वांना हाकारा
एकटीचा स्वार्थ
त्याला नाही थारा
मुंग्यांची रांग..

मेला कोणी किडा
उचलला विडा
कुवतीपेक्षा जड
घोळक्यानं ओढा
मुंग्यांची रांग..

संग्रहाची हाव

मिळेल त्यावर ताव
साठवण संपेना
गरजेचं नाव
मुंग्यांची रांग..

पडताच थंडी
लाखलाख अंडी
खायला हवं
वाढत्या तोंडी
मुंग्यांची रांग..

पावसाळी हवा
जीव घेऊन धावा
शोधत सुटल्या
आसरा नवा
मुंग्यांची रांग..

कोणी एक मेली
वाटेत पडली
बाकीचे मिळून
खाऊन संपली
मुंग्यांची रांग..

पायाखाली येतात
चिरडून मरतात
त्यातून जे वाचले
शोक कुठे करतात
मुंग्यांची रांग..

कामावाचून काही
सुचतच नाही
काही झालं तरी
वाचा फुटत नाही
मुंग्यांची रांग..

कामापुरती नाती
भाव ना भक्ति
देहाची राखण
बाकी मूठमाती
मुंग्यांची रांग..

# माझी विस्मृतिची सवय

कल्पी जोशी

आजकाल माझी विस्मृतिची सवय वृधिन्गत होत चालली ,सासुबाई याला गबालेपना म्हणतात , आईचं वालन म्हणुन टोमने ऐकून घ्यावे लागतात ,लागत मनाला पण पुर्विसारख तीच गोष्ट मनात घोकत रहात नाही .विसर पडतो .हा एक चांगला परिणाम म्हणता येइल .परवाची गोष्ट ,जाउद्या पूर्ण आठवणार नाही.आठवायला आठवडा लागेल आणि आठवड्याचं कोष्टक बिघडेल काही हरकत नाही निदान आज्च्यापुरत बोलूया .आम्ही दोघी मैत्रिणी सिनेमाला गेलो कधी नव्हे ते, उतरल्यावर रिक्शा भाडं द्यायला पर्स काढली .आत चश्मा नाही हे लक्षातच आले नाही .सिनेमा सुरु होणार म्हणुन मी पर्समध्ये चश्मा शोधू लागले ,चश्मा नाही ! झाल मी आणि संगीता बोलायल लागलो ,चश्मा कुठे ठेवला असेल ? हरवला तर नसेन, आमची कुजबुज सुरूच होती ,(ती कुजबुज हॉलच्या शांततेत जरा जास्तच असावी) कधी सिनेमा सुरु झाला कळालच नाही,लोकांनी जेव्हा "आवाज आवाज" सुरुवात केली तेव्हा आमच्या लक्षात आलं खरतर परद्यावर संवाद सुरु होते ,मग हे आवाज प्रकरण काय आहे ...हे माझ्या लक्षातच येइना , एव्हाना संगीता डोळे फाडून नायक आणि नाईकेचे आलिंगन बघत होती, किती घट्ट आहे हे बघत असावी बह्नुतेक .

मी म्हणते काय तरी बाई हिचे काय दिवस आहेत ,हे असलं काही बघण्याचे ...हा एकदम आठवल

काल रात्रीचा प्रसंग .मी लिहायला बसले ,ह्यांचं अपाला कधी संपणार तुझं लिखाण .ज़रा आवरत घेऊ म्हनल तर , मला पण मेलिला तेव्हाच सुचत लिहायला वेळतरी कधी असतो म्हणा ,लिखाण करायला .दिवसभर राब राब राबा ..मुलांचं गृहपाठ ,ह्यांनी सांगितलेली बाहेरची कामं ,सासुबाइंचं औषधं . सारं काही डोक्यात ठेवता ठेवता माझी आवाड्च राह्नुनच जाते लिहिण्याची .ह्यंच ृटुमणं सुरु , ह्यांचं सगळं व्यवस्थित करा ! जरा आपला विचार करत नाही नेहमी ह्यांचाच कौतुक ..का? का करू मी हे सगळे ..यांची बायको म्हणुन? जरा बरं नसला कि अडत सर्वांचं .एक ना दोन भाराभार चिंध्या होतात सर्व .हा चिंध्यांवरुन आठवल ,त्या दिवशी घरात सॉंप म्हणुन चिंध्या मगिताल्या जाळायला (मारला ह्यानिच ,मी सापाला खुप घाबरते बरं कां ) तर आइन्नी माझी उशी फाडून चिंध्या काढून दिल्या . असं वाईट वाटलं म्हणुन सांगू ! किती कलाकुसरिणी मी ती उशी तयार केली होती. त्यात आईने दिलेले माझे लह्न्पनिचे दुपते ,माझ्या मुलांचे झबले आणि माझ्या माहेरच्या साडीच्या चिंध्या होत्या . काही सुद्धा नव्हतं सासरच....

सुताचा धागा सुद्धा !! अरे सुतावरून स्वर्ग गाठता येतो काय कधी ? खरच माझा स्वर्ग माझं घरच आहे ..माझ्या घराच्या चारही खोल्यात आहे .अंगनात आहे .इतर तितर सर्वत्र आहे या बैठकीत आहे , स्व्य्नापक्घरात आहे ...या माझ्या bedroom मध्ये आहे . आठवल !!!! यांनी पूर्वी सांगितल्याप्रमाणे

माझा चश्मा काढून टेबलवर ठेवला होता , आणि तिथेच माझ पेन पण होतं आणि मी तो चश्मा तिथेच विसरून आले ... मला चश्म्याचा शोध लागला आणि मी संगीताला जरा जोरातच भान विसरून हाक मारली "संगीता" .public ओरडली पुन्हा "आवाज आवाज " आता मला लक्षात आला मघाच्या

"आवाज "चा अर्थ .संगीता माझी मैत्रिण रागमिश्रीत कौतुकाने पाहून म्हणाली शेवट आहे ग सिनेमाचा !!!

---

---

# जुनी पत्रं

प्रसन्ना जीके**...**

आज उघडुन बसले होते
सगळी जुनी पत्रे
तुझी, माझी, काही जपलेली,
न पाठवलेली, काही फाडलेली....

कधी डोळे भरुन येत होते
कधी रागाने लाल होत होते..
कधी मी उदास होत होते
कधी हरवून जात होते...

एक पत्र तुझं मला पाठवलेलं
एक असच खुप जुन्या मैत्रिणीचं
पहिल्यांदा माहेरी गेल्य नंतर
एकटं वाटत असताना तू लिहिलेलं
तसचं तुझ्या सोबत आल्यानंतर
सखी ने पाठवलेले खास बंध....

असच एक पत्र हाती आलं
खुप खोल दडवून ठेवलेलं..
माझ्या बाबांच......
लग्नानंतर आलेल पहिलं पत्र...
खुपसं काळजी करणारं
तेवढचं धीर देणारं..
खुप न सांगता खुप काही सांगणारं....
जपुन ठेवलय मी आज ही
आज तेच पत्रं म्हणजे
माझे बाबा झालेय
मला सोडून गेलेले पण तरीही
आजही सतत सोबत असणारे........

======================================================================

# कथा .....

सुनील जोशी

धप्पकन आवाज आला आणि काय पडलय म्हणून बघायला दुख-या गुढघ्यानवर जोर देत मी समोरच्या खोलीत आले. बघते तो काय अविनाश अस्ताव्यस्त खाली कोसळलेले. मी भांबावले . धावतच त्यांच्या जवळ गेले . त्याना उचलाया लागले . माझ्याच्याने काही हलेनात. घरात आम्ही दोघचं ... काय झालय ... असे कसे पडलात .. चक्कर आली की काय? ..मी विचारत होते .पण ते काही बोलेनात .. मी घाबरले.... टी.व्ही . जोरात सुरु होता ...

मला काही सुचेना.. माझ्याच्याने तर काही हलत पण नव्हते.. पटकन मी दार उघडलं . समोरच्या सोमणाकडे धावले.त्याच्या डोअर बेल वर बोट ठेवलं ..चक्क दार उघडे पर्यंत उचललचं नाही .

रवि धावत आला .. न थाम्बणा-या बेल ला वैतागुन , दार उघड्न त्रासिक चेह-याने बघू लागला . तो त्रासिक चेहरा जाणवला, पान माझा रंग उडालेला चेहरा बघून तो म्हणाला काय झालय काकू ? तुम्ही अश्या घाबरलेल्या का दिसताहांत ?

अरे रवि हे बघ कसे करताहेत , लवकर ये रे ... त्याने बाबाना आवाज दिला आणि तड़क तो आमच्या घरात शिरला ... थेट ह्यांच्या जवळ पोहोचला , त्याच्यामागोमाग सोमण साहेब , वाहिनी सगळेच आलेत . ह्याना उचलून त्याने पलंगावर ठेवले. आणि क्षणाचाही वेळ ना दवड़ता पटकन डॉक्टर साहेबंना फोन केला.

पाचच मिनिटात डॉक्टर आलेत , आलेत ते केवळ उपचार म्हणूनच . नाडी बघितली ...श्वास बघितला ... आणि माझ्याकडे वळुन बोललेत... वहिनी सॉरी....

It was Massive cardiac arrest , which he could not sustain ..... ह्रदय विकाराच्या तीव्र झटक्याने अविनाश कोसळले ..ते शेवटचेच

अविनाश गेलेत ... मला कळेच ना ... काय झालय ते ... रवीने वृषाली ला पटकन फोन लावला. डायरितुन नंबर घेत त्याच्या मोबाईल वरून ह्यांच्या भावाकडे कळवलं ... वृषाली आमची कन्या .. सहा महिन्यापुर्विच लग्न झालं तिचं ... बाबा वर खुपच जीव तिचा ... निरोप पोहोचताच ती आणी जावई एक तासात हजर झालेत . येताच तिने ह्रदयद्रावक हम्बरडा फोडला. तिचा आकांत साहवेना. जावई पण एकदम सुन्न झालेत ...

दुक्खाचा पहिला उमाळा ओसरला. स्वतःला सावरत मग तिने काही नातेवाईक आणि मित्राना कळवले. एक एक करत सगळे जण येऊ लागले . सकाळ ची वेळ असल्याने सगळे जण घरीच सापडले. दुपारी एक वाजता महायात्रा निघाली . दीर आणि पुतण्या ह्यानी सगळी व्यवस्था केली. महायात्रा निघताना वृषालीचा विलाप असह्य होता. तिचा लाडका बाबा आता तिला पुन्हा दिसणार नव्हता ...

वृषाली आमचं लाडकं कन्यारत्न . अगदी जनमली तेव्हापासून तिच्या बाबाशी कशी एकरूप झालेली. तिने काही मागायचं अणि क्षणात तिला ते मिळायाचं. अजुन काही होइल किंवा नाही ...पण वैशालीची डिमांड ..मग आकाश पाताळ एक करू पण तिची मागणी पूर्ण होणारच हा खाक्या ... पण ती सुद्धा समजदारच होती उगा कधी तिने बाबाला अडचणीत नाही टाकले.

तिच्या लग्नात पण काय खुश होता अविनाश .... चक्क लग्नाच्या वरातीत नाचले होते ते ... त्यांच्या एकुलत्या एक लाडक्या कन्येचा विवाह होता तो . खुप हौसेने केलं सगळ. आणि मग इतक्या लौकर आणि एका झटक्यात सगळ संपलं पण.... सगळे जण सुन्न झाले होते ... वृशालिच्या तर आसवाना खंडच नव्हता. मी पण शुन्यवत झालेली .काही सुचतच नव्हतं ...

महायात्रा आटोपली . सगळे जण सांतवन करून हळु हळु परतु लागलेत. आणि मग मी पण त्यांच्या बरोबरच्या त्या सुखद क्षणाच्या आठवात गढून गेले. नुकत्याच बघितलेल्या चित्रपटा सारख्या त्या घटना डोळ्या पुढून झर झर जाऊ लागल्यात.

मी २२ वर्षाची नुकतीच Graduate झालेली . आताशा कुठे बाबानी मझ्यायासर्ही स्थळ बघायला सुरुवात केलेली . कुणीतरी सुचवलेलं हे स्थळ . अविनाश सानेच. मुलगा स्वताचा उद्योग करतो . पण उत्तम स्थळ आहे म्हणून सांगितल्या गेलं होतं . बाबांचा पण स्वताचा व्यवसायच होता त्यामुळे आम्हाला चालण्या सारखं स्थळ होतं .

तीस वर्ष झालीत त्या गोष्टीला आता ..पण अजुनही कसं सगळ ताजं ताजं कालच घडल्या सारखं वाटतय. पहिल्याच स्थळाकडून होकार आला . सगळ कसं स्वप्नवतच ... दोन्ही कड्ची मंडळी सुखवस्तू .त्या मुळे लग्न सुद्धा थाटातच झालं . अजुनही आठवतेय ती विहिणीची पंगत ... मग तो गृह प्रवेश ... ते माझं सान्याच्या घरात माप ओलांडून प्रवेश करण....

ह्यांचा व्यवसाय मुंबई ला असल्याने लवकरच गाव सोडून आम्ही मुंबई ला आलोत.

इथे सगळ कसं वेगळ होतं . गावाकडे काही आरामशीर जीवनाची सवय ..इथे मात्र सतत घाई.. मी गोंधळुन जायचे सुरुवातीला .पण हळु हळु सवय झाली .

अविनाश सतत फिरतीवर असायचे . उद्योग वाढीचा ध्यास घेतलेला. सुरुवातीला मी जायचे सोबत . पण हे नेहेमिचच आहे बघितल्यावर मी कंटाळा करू लागले .
लग्नाला ३ वर्ष झालीत . सासू, नणद, आई , वहिनी..सगळ्या विचारू लागल्यात ..कधी देणार पेढे .... काही प्लानिंग वगैरे आहे की काय?

पण ह्यांच्या फिरस्ती मुळे ..आता काय सांगणार ना मी... सगळी सुखं ओसंडून वहात होती पण आपल्या माणसाचा हवा हवा सा सहवास तेवढा घडत नव्हता. सगळ असून सुद्धा मी उपाशीच होते

जून चा पहिला आठवडा . गर्मी मी म्हणत होती . उकाड्याने सगळे हैराण झालेले हे नेहेमि प्रमाणे बाहेरगावी गेलेले . २ महीन्या पुर्वीच आम्ही ह्या नव्या जागेत शिफ्ट झालेलो.

संध्याकाळचे ८-८.३० झालेले . दारावरची बेल किणकिणली. कोण असेल बरं ह्यावेळी... मी विचार करू लागले . आय होल मधून बघितलं ..एक माणूस ... बैग घेउन ... अरे हां तर जयेश दिसतोय ... मी निश्शंक मनाने दार उघडले.

जयेश.... दादाचा दोस्त.... माझ्याकडे बघायचा चोरून ..शाळेत असताना.. मैत्रिणी सांगायच्या . पण आता त्याला काही अर्थ उरला नव्हता .

या जयेश भाई. कसे येण झालं? त्याना आत घेतलं आणि दार ओढून घेतलं

काय म्हणतेस नीला कशी आहेस? काय आहे सुरु? काय म्हणतात मिस्टर?

टिपिकल व्यापारी कुटूम्बातला जयेश , दादाचा वर्गमित्र

माझं मस्त सुरु आहे , आणि हे पण मजेत आहेत ... पाणी देता देता मी बोलले . बसा हा एक मिनिटात चहा घेते हं म्हणत मी चहा करायला आत आले .. चहा करून मी समोर आले . जयेश भाई बोलले ..मिस्टर दिसत नाही ते?

अरे ते तर बाहेर गावी गेलेले आहेत ...

ओह्हो ..मग वांधा झाला ...

का काय झालय? काही प्रॉब्लम आहे का जयेश भाई?

नाही नाही ..मला वाटलं साहेब असतील ... मी खरं तर माझ्या साळ्या कड़े जाणार होतो ..पण काय झालय ना नेमका तो नाही इकडे आज .. मग विचार केला तुझाकडे थांबू या ..पण जाऊ दे करतो मी काहीतरी व्यवस्था ...

अरे त्यात काय जयेश भाई थांबा की इथेच ... काही प्रॉब्लम नाही ..आम्ही साधे लोक आहोत पण चालेल ना तुम्हाला ... जयेश भाई तयार झालेत ...

एकटीच असल्याने जेवण असे तसेच काही तरी खाऊन घ्यायचा विचार होता . पण आता जयेश भाई असल्याने सगळ करण आलं .. जेवण बनवून गप्पा टप्पा करत करत ११ कधी वाजले ते कळालेच नाही.

गुडनाईट करून मी माझ्या खोलीत झोपायला गेले आणि जयेश भाई ची व्यवस्था हॉल मधे केली होती. बाहेर वातावरण कुंद होतं . गर्मी पण प्रचंड वाढलेली . अचानक विज चमकली ..अणि प्रचंड गडगडाट झाला .. हळु हळु मी निद्रेच्या आधीन झाले ..

सकाळी जरा उशीरानेच उठले ... कपडे जरा अस्ताव्यस्तच झालेले होते ... अणि अंग पण जरा दुखत होतं . पण आतून एक सुख संवेदना जाणवत होती.

बाहेर जयेश भाई तयार झालेले दिसत होते . झाली का झोप नीला ... जयेशभाई विचारत होते ... त्यांच्या डोळ्यात एक चमक जाणवली मला ... काहीसं आठवत होतं मला ... झोपेत झालेले स्पर्श ...हवे हवेसे वाटणारे .... की तसलच काहीस..

मी पटकन बाथरूम ला पळाले . २ मिनिटात फ्रेश होउन बाहेर आले . चहा केला आणि जयेशभाईना दिला मी पण घेतला. चहा झाला आणि ते निघालेत ..

दोन दिवसानंतर अविनाश आलेत . ते थकून गेले होते. आल्या आल्या त्यानी घोषणा केली मी आता ३ दिवस कुठे बाहेर नाही जाणार ..हे ३ दिवस आमच्या राणीसाहेबा साठी... खुप मजा आली तेव्हा ... दिवसाची रात्र करून सतत माझ्या वर प्रेमाचा वर्षाव करत होते अविनाश तेव्हा ... भर भरून दान टाकलं माझ्या झोळीत त्यानी ...

पाळी चुकली ... लाजत लाजत ह्याना सांगितले ..ते खुश झालेत ... लगेच डॉक्टर कड़े घेउन गेलेत. सगळ्या तपासण्या केल्यात आणि मग Confirmation मिळताच सवारी चा आनंद गगनात मावेना. लगेच त्यानी त्यांच्या आईला , माझ्या आईला फोन करून हे गोड गुपित सांगितलं ..आणि मला पण कड़क

डोहाळे लागले होतेच ..त्यामुळे सासू बाई आणि आई दोघी पण लगेच मुंबई ला आल्यात.

सगळे जण मला जीवा पाड जपत होते. दिसामासानी माझा घेर वाढत होता. सातव्या महिन्यातच आई मला घेऊन माहेरी आली . अविनाश आज कल खुपच हळवे झालेले होते. बोलत फार कमी पण काळजी मात्र खुप घेत ...

नववा महीना भरत आला ... ... आता वाट होती कळा सुरु होण्याची ... तो ही दिवस उगवला ... आणि मग जन्म झाला वृशालिचा ...अगदी गोजिरवाणी मऊ मऊ शी गुबगुबीत वृषाली ...अगदी माझ्या वर गेली होती ...

वृषाली हे नाव पण अविनाश च्याच आवडीचं . दिसामासानी वृषाली वाढत होती. अभ्यासात पण हुशार होती आणि कलेत पण पारंगत . तिच्या बाबाला फार तिचं कौतुक ...

पुतण्याने सर्व विधि यथा सांग पार पाडलेत . सगळ कसं विधिवत , दशक्रिया, तेरावं , शुद्ध श्राद्ध ... आता सगळे जण निघालेत आपापल्या घरी . निघताना वृशालिचा पायच निघेना. सतत मागे वळुन बघत होती.. वाटत होतं पटकन बाबा येतील आणि तिला हाक देतील ...

आता मी एकटीच उरले ... तो टी व्ही पण बघावासा वाटेना ... काही तरी करावं म्हणून उचक वाचक करू लागले. ... जुन्या आठवणी दाटून येत होत्या . जुना एल्बम काढावा म्हणून कपाट उघडले. मी कधीच ह्यांच्या कपाटाला हात लावत नव्हते ...

मला रडूच कोसळले ... त्या कपाटाला हात लावताना .. तो एल्बम शोधू लागले.. शोधता शोधता एक लिफाफा पडला खाली ... कसला लिफाफा ... जुनाट सा दिसत होता ... डॉक्टर बर्वे... ... अरे बाप रे ते तर केव्हाच गेलेत ... कसला लिफाफा आहे बघू या ज़रा म्हणून उघडला... कसलासा रिपोर्ट दिसतोय ... फार जुना रिपोर्ट दिसत होता... वृशालिच्या जन्माआधीचा .. कसला रिपोर्ट आहे आणि का जपून ठेवलाय...

त्या रिपोर्ट वरची तारीख आणि त्यावर लिहिलेले ते शब्द ..मला जणू वाकुल्या दाखवित होतेत ... मिस्टर अविनाश साने.... ... रिपोर्ट on २५/०५/१९८४ Confirms impotency of Mr Sane.

==========================================================================

# मोल

साधना गोखले

माझ्या फाटक्या गोधडित लपलेले दारिद्र्य मला एकदा म्हणाले
कविता म्हणजे काय ?
मी म्हणालो कविता म्हणजे भावनांचे शब्दरूप,कल्पनेचे चित्ररूप स्वप्नांचे मूर्त स्वरुप
मी आहे एक कवी ,मला स्वप्नपुर्ती हवी
दरिद्र्याने हसून माझ्याकडे पाहिले अन म्हटले,
मित्र काव्याने भागते का रे पोटाची भूक
स्वप्नांना सत्य मानने ही मोठीच चुक
मी म्हणालो कविता आपल्याला आनंद देते
जगण्याचा मन्त्र शिकवते
पोटाच्या भुकेवर मात करते
दरिद्र्याने तुछ्तेने पाह्रून विचारले,असे असेल तर लोक का करतात
आयुष्याचा व्यापार?
लाल दिव्याखाली का मांडला जातो शरीराचा बाज़ार?
मी असहाय तेने मान खाली घातली घातली
कवितांची वही त्याच फाटक्या गोधडित लपवली
उदास मनाने सारी पोतडी खांद्यावर टाकली
नाक्यावरच्या राद्दीवाल्याला दिली
खंडकाव्य,महाकाव्य,चारोळ्या,स्फुट कविता त्याने
एकाच मापात मोजल्या
माझ्या कविमनाला असह्य यातना झाल्या
यापासून बेखबर त्याने माझे स्वप्न कठोर सत्याच्या तराजुत तोलले
अन जीवनाचे खरे मोल आहे फ़क्त ६० रु ५० पैसे
हे मला तेव्हाच कळले...

# सरणार कधी रण......

मृत्युंजय



सरणार कधी रण प्रभू तरी
हे कुठवर साहू घाव शिरी

दिसू लागले अभ्र सभोती
विदीर्ण झाली जरी ही छाती
अजून जळते आंतर ज्योती
कसा सावरु देह परी

होय तनूची केवळ चाळण
प्राण उडाया बघती त्यातून
मिटण्या झाले अधीर लोचन
खड्ग गळाले भूमीवरी

पावन खिंडीत पाऊल रोवून
शरीर पिंजेतो केले रण
शरणागतीचा अखेर ये क्षण
बोलवशील का आता घरी

( कुसुमाग्रज)

कुसुमाग्रजांचे 'विशाखा' मधील एक अप्रतीम काव्य. ऐकायचे, श्वास छातीत गुदमरवत ते डोळ्याची तोरण करुन बघायचे आणी शेवटी हळुच डोळ्याच्या कडा पुसत पावनखिंडीत त्या नरप्रभु समोर नतमस्तक व्हायचे.

स्वामीनिष्ठा शब्द ह्याच नरपुंगवांमुळे जन्माला आला असेल काय हो ? काय ती स्वामीनिष्ठा, काय ते शौर्य ती विरश्री ! बघुनच भलीभली शस्त्रे जागी थंडावली आणी पुढे पडणारी यवनी पावले मागे हटली.

होय तनूची केवळ चाळण
प्राण उडाया बघती त्यातून
मिटण्या झाले अधीर लोचन
खड्ग गळाले भूमीवरी

प्रभो शिवाजी राजा, अरे हे खडग भुमीवर गळुन पडलय , ह्या निशस्त्र देहाचे शस्त्र बनवुन आता यवनी राक्षसाला मी रोखुन धरलय. प्राण जाण्याची वेळ आता नजीक आलिये प्रभो...

"पावन खिंडीत पाऊल रोवून
शरीर पिंजेतो केले रण
शरणागतीचा अखेर ये क्षण
बोलवशील का आता घरी"

शरणागती ? आणी बाजी प्रभु मागणार ? अहो शक्य तरी आहे का ? शरीराच्या शेवटच्या कणात ताकद असेपर्यंत आणी रक्ताचा शेवटचा थेंब आहे तोवर लढायचे ही आमच्या राजांची शिकवण ! आणी हा बाजी शरण जाईलच कसा ?

मग शरणागती कशासाठी ? कुठल्या घरी जायची तयारी ?? अहो शरणागती म्हणजे 'राजा किल्ल्यावर सुखरुप पोचत नाही आणी जोवर तोफांचे आवाज कानी पडत नाहीत तोवर मृत्यु समोरही गुढगे टेकणे नाही. शरणागती नाही. भिती मावळ्यांना, बाजीप्रभुला मृत्युची नाही.. तो तर आमचा सखाच आहे, पण काळजी आहे त्या लाखाच्या पोशींद्याची, त्याच्या गडावर सुखरुप पोचण्याची.

अंबा गावाजवळची, पन्हाळ्याच्या वाटेवरची ती अवखड खींड आणी त्या पावसाळी रात्री खानाच्या सैन्याला अक्षरश: खिंडीत गाठणारे ते 'नरसींह' मावळे आणी त्यांचा नेता बाजीप्रभु. "राजे जोवर तोफांचे आवज होत नाहीत, तोवर एकही यवन ह्या खिंडीला पार करणार नाही" असा शब्द देणारा बाजीप्रभु आणी आपल्या राजसाठी आपल्या दैवतासाठी छातीचा कोट करुन उभे राहिलेले ते अनाम मराठेवीर. अरे मराठेशाहीची दौलत ती हिच ! काय लुटावे लुटणाऱ्याने ??

आपल्या रक्ताने ह्या खिंडीला पावन करणाऱ्या ह्या मराठी 'दौलतीस' मानाचा मुजरा.

# असंही होतं एक प्रेम...

अभिजित थिटे

"अम्या असं कसं झालं रे... नक्की काय म्हणाली ती?"
"तुला सांगितलं, तेच म्हणाली. आणि त्यानंतर काही बोलण्यासारखं राहिलंही नव्हतं...'
"रागावू नकोस; पण मला पुन्हा एकदा सांगतोस काय झालं ते...'
"जवळपास गेला आठवडा आम्ही फारसे भेटत नव्हतो, हे तुला माहितीच आहे. तेव्हाही न भेटण्याचं तसं विशेष काही कारण नव्हतं; पण भेट घडत नव्हती हे खरं... काल तिचा फोन आला. आज नक्की भेटूया म्हणाली. मी नेहमीप्रमाणे तिला खेचू लागलो, तर ती खूप सिरीअस वाटली. आवाजावरून रडल्यासारखी वाटत होती. मी कारण विचारलं तिला... तर काहीच बोलली नाही... भेटल्यावर बोलू म्हणाली.'
"मग?'
"मग काय आम्ही भेटलो आज. काहीतरी गडबड आहे... काहीतरी विचित्र घडलंय किंवा घडणार आहे असं मला सारखं वाटत होतं... आज मनूला भेटताना नेहमीसारखं मस्त नव्हतं वाटत... म्हणजे इतर वेळी आम्ही भेटणार म्हटल्यावर जसं वाटायचं तसं नव्हतं वाटत. तुला सांगता येत नाहीये आत्ता... म्हणजे काय वाटत होतं ते शब्दांत नाही सांगता येत...; पण ते काहीतरी विचित्र फिलिंग होतं...'
"आम्ही आपल्या नेहमीच्या जागी भेटलो. तिचा चेहरा मलूल दिसत होता. फारसं बोलली नाही ती. मी विचारलं तिला, "काय प्रॉब्लेम आहे? काय झालंय नक्की?' तर ती म्हणाली, "तेच बोलायला आलोय आपण; पण आधी काहीतरी खाऊन घे... नेहमीप्रमाणे उपाशीच असशील...' मग आम्ही खायला मागवलं; पण ती नीट खात नव्हती. नेहमीप्रमाणे माझ्या डिशमधला घासही घेतला नाही तिनं... अन्न चिवडत बसली होती फक्त... तुला गंमत सांगतो, आज यांचं काहीतरी बिनसलंय हे आमच्या नेहमीच्या वेटरच्याही लक्षात आलं... त्यानं तसं विचारलं सुद्धा... माझं खाणं झाल्यावर ती म्हटली, "चल पुलावर जाऊ...' काय झालंय हे माझ्या लक्षात येत नव्हतं आणि ती काही बोलायला तयार नव्हती... आम्ही पुलावर जायला निघालो. आज बिल तिनं दिलं... तुला ठाऊक आहे, नेहमी बिल मीच देतो. पण आज तिनं मला अडवलं आणि पैसे काढून दिले.
आम्ही पुलाकडे जायला निघालो. ती गाडीवर मागे बसली होती ना, तेव्हाही नेहमीसारखी नव्हती बसली. माझ्या खांद्यावरच्या तिच्या हाताची थरथर मला जाणवत होती... माझ्यासमोरचं प्रश्नचिन्ह वाढतच होतं...
आम्ही पुलावर पोचलो. मी गाडी लावली आणि आम्ही खाली बसलो. ती मान खाली घालून बसली होती. तिला म्हटलं, बोल आता... काय झालंय ते सांगून टाक पटकन. आता माझा जीव नको खाऊस... तिनं वर पाहिलं, तर डोळ्यात पाणी होतं तिच्या... तिनं पर्स उघडली आणि मला एक पासबुक दिलं. "हे तपासून घे,' म्हणाली. तुला माहीत नाही... मी तिला प्रत्येक महिन्याला पैसे द्यायचो. तिनं एक अकाउंट उघडलं होतं, त्यात ती ते भरायची. त्यात स्वत:चीही भर घालायची. आमच्या संसारासाठीची बचत होती ती!
ते पासबुक हातात घेतलं आणि विचारलं, "काय भानगड आहे ही? मी तुला आजपर्यंत त्याबाबत कधी विचारलंय का? आणि आज एकदम हे काय?'
तिनं माझा हात हातात घेतला... तिचा हात थरथरत होता. मी त्यावर थोपटलं... पाच-दहा मिनिटं आम्ही तसेच स्वस्थ बसून राहिलो. मी तिला थोपटत होतो. तिनं मला विचारलं, "तुझा विश्वास आहे माझ्यावर?'
मी म्हणालो, "मग कोणावर ठेवू?'
ती म्हणाली, "आपण लग्न नको करायला... का ते विचारू नकोस. मला नाही सांगता येणार; पण आपण लग्न नको करायला...'
ती काय म्हणते आहे, हे मला कळलंच नाही कितीतरी वेळ... समजलं तेव्हा कशाचंच भान नव्हतं राहिलं. माझा तिच्यावर पूर्ण विश्वास होता आणि आहे. ती तसं म्हणते यामागे काहीतरी कारण नक्कीच असणार... पण असं कसं होईल... ती माझ्याशिवाय आणि मी तिच्याशिवाय कसे जगू शकू..? अक्षरश: काही समजत नव्हतं. कितीतरी वेळ आम्ही तसेच सुन्न बसून होतो नदीकडे बघत आणि ती नदी

आमच्या दोघांच्या डोळ्यातून वाहात होती. बराच अंधार पडल्यावर आम्ही उठलो. तिला घरी सोडलं... आणि मी इथं तुझ्याकडे आलो...'
"अम्या, असं कसं होईल रे... ती का म्हणाली असं? तू विचारलं नाहीस तिला? मी विचारू का?'
"नको. तू काही बोलू नकोस. मीही कधीच विचारणार नाही. माझा विश्वास आहे तिच्यावर काहीतरी नक्की घडलंय...'
"अरे पण आपल्या ग्रुपला काय सांगायचं आता? आणि तू तुझ्या घरी काय सांगशील?'

राहुलच्या कोणत्याही प्रश्नाचं उत्तर देण्याच्या मनःस्थितीत अम्या नव्हताच. तो केव्हाच हरवून गेला होता. अम्या हरवला होता, त्यापेक्षा राहुल जास्त हरवला होता. हरवणारच होता तो... तो धक्काच तेवढा मोठा होता... अम्या आणि मनू काही थोडा काळ एकमेकांसोबत नव्हते. लहानपणापासून ओळखत होते ते एकमेकांना. फक्त ओळखत नव्हते, तर एकमेकांशिवाय ते कुठंही जात नव्हते की येत नव्हते. भांडणं आणि मारामाऱ्याही तेवढ्याच जोरदारपणे करायचे. बरं दोघांच्याही शाळा वेगळ्या आणि पुढे कॉलेजही वेगळी; पण एका शिबिरात ते भेटले आणि तेव्हापासून एकमेकांचेच झाले होते. हे जे काही आहे, त्याला प्रेम म्हणतात, हे त्यांना दहावीच्या सुटीत जाणवलं. ते पैसे साठवण्याचं खूळ तेव्हापासूनचं होतं. अर्थात त्यावेळी मनू एका पिगी बँकेत पैसे टाकायची. अम्याच्या कॉलेजचा ग्रुप हसायचा कधीकधी त्यांना... चेष्टाही करायचा; पण त्यांना त्यांच्या प्रेमाची, त्यांच्यामधील गाढ नात्याची जाणीवही होती. थोडीथोडकी नाही, 12-14 वर्षं दोघं एकत्र होते. कॉलेज संपल्यावर ती नोकरी करू लागली आणि हा व्यवसायात पडला. तेव्हाही याची अकाउंट्स तपासणं, तो जेवला की नाही पाहणं यावर तिचं पक्कं लक्ष असायचं. त्यांची ती शेवटची भेट होती, तेव्हाही तिनं आधी त्याला खायला लावलं होतं... अम्या कधी कसा वागेल, हे तिच्याइतकं कोणीच सांगू शकायचं नाही आणि तिच्याबाबत अम्याला विचारून घ्यावं. अम्या केव्हा रागावतो, त्याला काय काय आवडतं इथपासून ते आत्ता त्याच्या गाडीत किती पेट्रोल आहे, तो बाहेरगावी गेला, तर किती वाजता कुठे असेल, घरी किती वाजता पोचेल इथपर्यंत बारीकसारीक गोष्टी मनूला माहिती असायच्या. तशाच मनूच्या त्याला. दोघं एकमेकांची प्रचंड काळजी घ्यायचे. कॉलेज वेगवेगळी असली, तरी अम्यानं कधी कोणती लेक्चर्स बंक मारली, त्याचं कुठलं कुठलं कम्प्लिशन राह्यलं आहे, हे मनूला बरोबर समजायचं. मग ती त्याच्या मागे लागून ते सारं करून घ्यायची.
या साऱ्या गोष्टी त्या दोघांच्या घरीही माहीत होत्या. म्हणूनच अम्याची तक्रार मनूकडे आणि मनूची अम्याकडे व्हायची. दोघांनी घरी स्पष्ट सांगितलं नसलं, तरी त्यांना कळत नव्हतं असं नाही. आणि त्यांचीही ना नव्हतीच! लहानपणापासून पाहात आले होते ते दोघांना... अगदी "मेड फॉर इच अदर...'

मग आता हे अचानक झालं काय, हे राहुलला समजेच ना... अर्थात जिथं अम्यालाच काही समजलं नव्हतं, तिथं राहुलला काय समजणार होतं? तरी राहुल विचार करतच होता; कारण तिच्या आणि त्याच्या अशा दोघांच्याही ग्रुपला त्यालाच उत्तर द्यायचं होतं. दोघांचा बेस्ट फ्रेंड होता तो. ते इतरांना "झाशा' देऊन हुंदडायला गेले, तरी त्याला मात्र खरंखरं सांगून जायचे. एकदा तर त्याला मनूच्या वडिलांनी विचारलंही होतं... "अरे त्यांना म्हणाव सांगून टाका ना एकदा आम्हाला स्पष्ट. आम्ही काय नाही म्हणणार आहोत का? असे किती वर्षं फिरणार आहात नुसतेच. आमच्या नातेवाइकांनाही माहितीये सगळं. एकदा अक्षता टाकल्या, की आम्ही मोकळे... तू बोल रे त्यांच्याशी...'
राहुलपुढे हा एकच प्रश्न सतत उभा राहात होता, "हे अचानक काय झालं?'

दोन महिन्यातच मनूचं लग्न झालं. अम्या घरचं कार्य असल्यासारखा राबला त्या लग्नात. राहुलला, त्याच्या ग्रुपला, एवढंच काय पण तिच्या घरच्यांनाही बघवत नव्हतं त्याच्याकडे. तो आणि मनू एकमेकांसमोर यायचं टाळत होते. तसे आले असते, तर बांध नक्कीच फुटला असता... लग्न लागलं. पंगती बसल्या. सगळा ग्रुप शेवटच्या पंगतीत बसणार होता. तेव्हा अम्या बाहेर सटकला. पंगत उठली, तरी हा काही दिसला नाही कोणाला. मनूची नजरही त्यालाच शोधत होती. तो उपाशी राहिलेला तिला अजिबात चालायचा नाही... पण अम्या उगवला तो थेट पाठवणीच्या वेळी. अर्थात जेवला का नाहीस, हे विचारण्याची कोणाचीही हिंमत नव्हती, मनूचीदेखील... पाठवणीच्यावेळी मनू त्याच्यासमोर आली. नवऱ्याशी ओळख

करून दिली. हा अम्या. माझा सगळ्यात जवळचा मित्र... त्यावेळी दोघांच्याही कंठात हुंदका अडला होता... फक्त दोघांच्याच नाही... त्यांना ओळखणाऱ्या साऱ्यांच्याच....

अम्याला सावरायला काही दिवस लागले. मनूला तेवढा तरी वेळ मिळाला की नाही ठाऊक नाही... मनू हनिमूनहून परत आली. आल्याआल्या तिनं पहिला फोन अम्यालाच लावला. तो सापडला नाही म्हणून राहुलला. अर्थात लग्नानंतर ती राहुलच्या संपर्कात होतीच. तिला अम्याची काळजी वाटत होती... पण अम्या काही तिला भेटायला तयार नव्हता. तिनंही त्याला वेळ दिला. शेवटी तिच्या लग्नानंतर दोन-तीन महिन्यांनंतर ते भेटले... त्याच नेहमीच्या जागी... नंतरही ते भेटत राहिले. अम्यासाठी चांगली मुलगी शोधण्याचा तिनं आता चंगच बांधला होता. त्याला कोणती मुलगी शोभेल, हे तिच्याशिवाय दुसरं कोण सांगू शकणार होतं?

पुढे अम्याही निवळला. त्याचंही लग्न झालं. आज अम्या आणि मनू आपापल्या संसारात रमले आहेत. दोघांनाही पोरंबाळं आहेत. भेटीगाठी आता खूपच कमी झाल्यात. म्हणजे सहा-सात महिन्यांतून एखादेवेळी वगैरे... तेव्हा मोबाईल नव्हते. आता आहेत. पण रोज फोन किंवा एसएमएसही नसतो. त्या दोघांना तशी गरजही नाही. ती दोघंही त्यापलीकडे कधीच गेली आहेत. आजही त्यांना एकमेकांबद्दल उत्तम माहिती असते. आपापल्या जोडीदारांशी ते प्रामाणिक आहेत. कदाचित काहींना शंका येते, त्यांच्या "इतर' संबंधांबद्दल... अर्थात त्याबाबत इतरांना दोष देण्यातही अर्थ नाही. 12-14 वर्षं एकत्र राहिलेल्यांमध्ये असे संबंध निर्माण झाले नसतील, यावर कोण विश्वास ठेवणार? पण विश्वास ठेवायला हवा. ते दोघंही एकमेकांच्या मनामध्ये इतके गुंतले होते, की त्यांना या गोष्टी खरोखरच दुय्यम वाटत होत्या. कधीकधी ते दोघं तिच्या किंवा त्याच्या घरी एकटेही असत; पण गाणी, गप्पा किंवा मारामाऱ्या याशिवाय दुसरं काही त्यांच्यात घडलं नाही... कोणी यावर विश्वास ठेवो, न ठेवो, राहुल, त्या दोघांचा ग्रुप आणि माझा मात्र पक्का विश्वास आहे. आम्ही सारे त्यांचं तर उदाहरण सांगायचो साऱ्यांना... आजही सांगतो... हे असं का झालं, हे अजूनही साऱ्यांनाच कोडं आहे. अम्यानं तिला हा प्रश्न आजही विचारलेला नाही आणि ती आपणहून सांगेपर्यंत त्याला समजणारही नाही... अर्थात त्याला समजल्यानंतरही तो आम्हाला सांगेल, असंही नाही...

एवढ्या कथेवरून तुमच्या लक्षात आलंच असेल, की मी या साऱ्याचा साक्षीदार आहे. हे सारं माझ्यासमोर घडलंय... मी ते माझ्या परीनं अनुभवलंय. मागे संदीप खरेच्या कार्यक्रमाला गेलो होतो... तेव्हा एक गाणं ऐकलं
कितीक हळवे, कितीक सुंदर
किती शहाणे, अपुले अंतर...
त्याच जागी त्या येऊन जाशी
माझ्यासाठी, माझ्या नंतर...
या दोघांना किती चपखल लागू होतं नाही...
ही गोष्ट अनेक दिवस मनात होती. सांगावीशी वाटत होती. अम्या आणि मनूच्या सफल न झालेल्या (खरंतर असं कसं म्हणणार? लग्नात परिवर्तन न झालेल्या, असं म्हणता येईल फारतर...) प्रेमाची ही कहाणी आहे.
कोणालातरी वाटेल, की ते दोघं आपापल्या जोडिदारांना फसवत असतील. तर तसंही नाही. आपापला संसार ते उत्तम रीतीनं करतात. आपापल्या संसाराला ते 100 टक्के देतात... आपलं प्रेम त्यांनी मनाच्या कुठल्यातरी खोल कप्प्यात अगदी अंधारात ठेवलंय एवढंच...

आज इतक्या दिवसांनी मला हे सांगावंसं का वाटलं ठाऊक आहे? ते दोघं पहिल्यांदा भेटले, त्याला नुकतीच 18 वर्षं पूर्ण झाली. आम्ही सारे, म्हणजे आमचा ग्रुप त्या दिवशी भेटतो. अगदी पहिल्यापासूनचा रिवाज आहे हा. नेहमीच्या अड्ड्यावर आम्ही भेटलो, प्रचंड दंगा केला. ती दोघंही हे सारं छान एन्जॉय करत होती. नेहमीप्रमाणे सारं वातावरण होतं. जाताना मात्र ती आमचीही नजर चुकवून चटकन निघून

गेली... डोळे पुसत होती, असं प्राजू म्हणाली... इकडं अम्याचेही डोळे पाणावले होते... राहुलनं सांगितल्यामुळे मलाही माहीत होतं, म्हणून त्याला सहज विचारलं, "अम्या, त्या पासबुकाचं काय झालं रे?' अम्या म्हणाला, "मी अजूनही तिच्याकडे पैसे पाठवतो. तीदेखील तिची भर घालून ते पैसे त्याच अकाउंटमध्ये ठेवते... अरे आमचं झालं नाही म्हणून काय झालं... आम्ही ठरवलंय पैसे साठवत राहायचे आणि एखाद्याचं पैशांमुळे अडत असेल, तर त्याला न बोलता देऊन टाकायचे... तिच्या एका मैत्रिणीला अडचण होती, तेव्हा आम्ही त्या कपलला ते पैसे देऊन टाकले. आमचा नाही झाला संसार... पण दुसऱ्याचा उभा राहू शकला, याचा आनंद आहेच की!!!

मी बऱ्याचदा नातेसंबंधांवर लिहीत असतो. कधी नॉस्टॅल्जिक होतो. प्रत्येक विषयानंतर माझी स्वत:ची काहीतरी कॉमेंट करतो. पण यावेळी नाही जमत तसं करायला. खरंतर आज इतक्या वर्षांनंतर हे लिहितानाही मी तो काळ अनुभवतोय आणि शब्द अडखळताहेत... होतंच... सॉरी आहेच... तसंच प्रेम आहे हे...

## श्रावनासखा कृष्ण हरी ह्रुदयी वसे माझ्या

**राजेश लोंढे**

श्रावनासखा कृष्ण हरी ह्रुदयी वसे माझ्या
अवती भोवती तुझ्यारे गोपिका पारी मीच तुझी राधा

गोकुली आज फेर धरी तुझा हा कन्हैय्या
प्रीतिने आज बहरुन आली मोहवती मला राधा
छेड़ काढती सखी तुझ्या राधेची रे गोपाला
सार्यांचा तू लड़का सख्याहरी पारी मीच तुझी राधा

सप्त सुरांची सरगम गाते कान्हाची मुरली
गीत पारी सुर छेड़ते मुखी तुझ्या
सजली नटली आज बहरली गोकुल नगरी
प्रीतिने आपल्या श्रुन्गाराली तूच गा माझी राधा

श्रावणात घन नीला बरसला रे आज सावल्या
चिम्ब परि मी भिजले मिठ़ीत तुझ्या
ओल्या सुगंधी वार्या संगे येई अंगावरी शहारा
दवासंगे लाज लाजली तुझीच झाली राधा

---

---

कवितेने सांगितली कविता करायला,
कशी कविता करू??
शब्द सापडेना मला लिहायला,
कोठून करू मी सुरु???

कविता करायला लागते,
शब्दांची संपत्ति,
शब्द सुचेना, काय करू,
आली मोठी आपत्ति...

कविता म्हणाली मला,
काही सांगू नकोस,
दर वेळेस कारणे सांगुन,
तू मला फसवतोस...

आता तुम्हीच सांगा मला,
कसे समजावू कवितेला???
शब्द आठवेना माझ्या मनाला,
आणि सांगते ही मला,
कविता करायला...

समीर जोशी

तुझं हसणं....
तुझं हसणं....
चंद्राभोवतालचं खळं
हिरव्यागर्द रानातील निवांत तळं

तुझं हसणं....
खळखळणारा झरा
भुरभुरणारा वारा

तुझं हसणं....
पावसाच्या धारा

तुझं हसणं....
सुगंधी पहाट
पक्ष्यांचा किलबिलाट
पाणी भरुन वाहणारा पाट

तुझं हसणं....
कळीचं उमलणं
पक्ष्यांचं उडणं

तुझं हसणं....
वसंत ॠतुचं येणं
लाजाळूचं लाजणं
उभ्या पीकातील शालूच्या ताटाचं डुलणं

- उमेश शितोळे